# भाळले

चांदणे फुलांवरी का भाळले
झाड सारे मुळासंगती भाळले
का कळेना कळीला गुह्य त्यातले
गंध सारे असे वायुला भाळले
नेत्र का सांगती भावना चांगल्या
ओठही का उगी त्यावरी भाळले
वेदना त्या तशा थांबती का कुठे?
आसवे गाळता भावही भाळले
जागली रातका आज ही नाकळे?
मंद ते गंधका तीवरी भाळले
जागणे रोजचे गूढ ते बोलणे
लेखणी भावता हातही भाळले
चंदनी गंधणे रोजचे झीजणे
घासता खोडही त्यास का भाळले

------------------

– प्र काश क्षीरसागर